I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): सांगली    P.S. (पोलीस ठाणे): कडेगांव    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0178    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 24/08/2026 20:38 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मंगळवार    Date from (दिनांक पासून): 07/07/2026    Date To (दिनांक पर्यंत): 07/07/2026

Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 12:49 तास    Time To (वेळेपर्यंत): 16:17 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 24/08/2026    Time (वेळ): 20:38 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 026    Date and Time (दिनांक आणि वेळ): 24/08/2026 20:38 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 1 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): अॅन्टी करप्शन ब्युुरो, सांगली, सांगली,मिरज

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): योगेश रमेश चव्हाण

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, सांगली, मिरज, सांगली शहर, सांगली, महाराष्ट्र-416416, भारत |
| 2 | स्थायी पता | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, सांगली, मिरज, सांगली शहर, सांगली, महाराष्ट्र-416416, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8108601919

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोहर धोंडिराम पाटील | | | 1. पश्चिम रस्ता क्रमांक 5,उपासना बंगला किसान नगर,Town/Village (शहर / गाव): ईश्वरपुर,Tehsil (तहसील): वाळवा,Police Station (पोलीस ठाणे): इस्लामपूर,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजेंद्र विष्णु पाटील | | | 1. लाड वस्ती,Town/Village (शहर / गाव): राजापुर,Tehsil (तहसील): तासगाव,Police Station (पोलीस ठाणे): तासगांव,District (जिल्हा): सांगली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

वर्दी जबाब दि. 24/08/2026

मी योगेश रमेश चव्हाण वय – 38 वर्षे व्यवसाय नोकरी पोलीस निरीक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली रा.सांगली ता.मिरज जि.सांगली मो.नं. – 8108601919 सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि.06/07/2026 रोजी पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे दालनात बोलावुन घेवुन सांगितले की, तक्रारदार श्री.नितीन अशोक कदम रा.हिंगणगाव बुद्रुक ता.कडेगाव जि.सांगली यांनी फोनव्दारे संपर्क करुन त्यांची श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार सांगून त्यांची तक्रार कडेगाव येथे येवून घेण्याची विनंती केली असलेचे सांगितले. श्रीमती यास्मीन इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार नितीन कदम यांना संपर्क करुन आम्ही पथकासह दि.07/07/2026 रोजी 11.00 वाजे पर्यंत कडेगाव येथे येत असलेचे कळवुन तेथे आल्यावर संपर्क करीत असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी दि.07.07.2026 रोजी मा.उप-प्रादेशिक परीवहन अधिकारी सांगली यांना पत्र व्यवहार करून वर्ग-4 चे एक पुरुष कर्मचारी व मा. महाव्यवस्थापक शासकीय दुध योजना मिरज यांना वर्ग - 4 चे एक पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयास उपलब्ध करुन देणेची विनंती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना संपर्क करुन दि.07/07/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता एसीबी कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

मी दिले सुचनेप्रमाणे वरील दोन्ही पंच 09.40 वा.चे सुमारास एसीबी कार्यालय सांगली येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/सुदर्शन पाटील, पोकॉ/सागर नायकुडे असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अ‍ॅन्थ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय चार चाकी वाहन महिंद्रा बोलेरो नं.एम.एच-10/ई.व्ही. 4684 मधून कार्यालयातून 09.50 वाजता रवाना होवून कडेगाव शहराजवळील कडेगाव एम.आय.डी.सी मधील बंद पडलेले वरलक्ष्मी टेक्सटाईल या दुकानचे समोरील मोकळे रोडवर सुरक्षित ठिकाणी 11.25 वा.चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार नितीन कदम यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे एक अनोळखी इसम हे मोपेड दोनचाकी वाहन सुझुकी अ‍ॅक्सेस एम.एच 50 डब्ल्यु 8426 वाहनावरुन आमचे समक्ष हजर झाले. सदर वाहनावरील इसमाने त्यांची ओळख श्री.नितीन अशोक कदम अशी सांगितली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.नितीन अशोक कदम यांना माझी, ए.सी.बी कडील स्टाफ व पंच यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री अतिश सुनिल परमार यांना पंच नं.1 म्हणुन व श्री.राहुल राजु जेधे यांना पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे निश्चीत केले.त्यानंतर तक्रारदार

श्री. नितीन अशोक कदम यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.नितीन कदम यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये, “तक्रारदार नितीन कदम यांनी राहुल पोळ रा.सासपडे ता.कडेगाव यांचेकडुन सासपडे गावातील गट नंबर 278 मधील त्यांची 23 गुंठे शेतजमिन खरेदी केली होती. सदर खरेदी केलेले शेतजमिनीची नोंद तलाठी तोंडोली यांनी सातबारा सदरी धरुन राहुल पोळ यांचे नातेवाईक यांना हरकतीच्या नोटीस काढल्या होत्या. त्यावेळी राहुल पोळ यांची पत्नी श्रीमती माधुरी पोळ यांनी सदर नोंदीस हरकत घेतली होती. माधुरी पोळ यांनी घेतलेल्या हरकत नोंद सुनावणीचे प्रकरण श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांचेकडे होते. दिनांक 25.06.2026 रोजी श्री मनोहर पाटील यांनी सुनावणी प्रकरणाचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देऊन खरेदी दस्ताची नोंद मंजुर करुन करणेकरीता त्यांचे कार्यालयातील काम करणारा राजेंद्र पाटील यांचेकडे 5,000/-रु देणेस सांगितली वगैरे मजकुर अर्जाचे अवलोकन केले.

तक्रारदार नितीन कदम यांनी श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव हे कडेगाव शहरातील मंडल अधिकारी कडेगाव या कार्यालयामध्ये काम करणेसाठी बसत असतात असे सांगितले. मी तक्रारदार श्री. नितीन अशोक कदम व पंच क्र.1 अतिश परमार यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी 12.49 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन रेकॉर्ड केले.

मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.01 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचेकडे दिला. त्यानंतर श्री नितीन कदम व पंच नं. 1 श्री. अतिश परमार हे तक्रारदार यांचेकडील दोनचाकी मोपेड वाहन सुझुकी ॲक्सेस एम.एच 50 डब्ल्यु 8426 वरुन मंडल अधिकारी कार्यालय कडेगाव येथे श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांची भेट घेणेकरीता रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार नितीन कदम व पंच नं.1 अतिश परमार असे आम्ही थांबलो असले ठिकाणी परत आले.तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मशीनी मी 13.20 वाजता बंद करुन सुरक्षिततेकरीता माझ्या ताब्यात घेतले.

त्यानंतर मी, तक्रारदार नितीन कदम यांना श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांचे भेटीबाबत विचारले असता, तक्रारदार नितीन कदम यानी हकीगत सांगीतली की, “मी व पंच श्री अतिश परमार असे मंडल अधिकारी कार्यालय कडेगाव येथे गेलेनंतर मी मनोहर पाटील मंडल अधिकारी यांना भेटुन माझे नोंदीबाबत विचारणा करुन त्यांना “मी बोललो काल त्यंना” असे बोलत असताना मनोहर पाटील मंडल अधिकरी यांनी मला त्यांचे कार्यालयातील राजेंद्र पाटील यांचेकडे जाणेबाबत हाताने इशारा केला. त्यावेळी मी त्यांना “..ह.. साहेबांकडे जावु का त्या” असे विचारलेवर मनोहर पाटील यांनी मला “जावा” असे म्हणाले. त्यावर मी मनोहर पाटील यांना “आणल्यानंतर यांना भेटायच का” असे विचारलेवर मनोहर पाटील यांनी होकारार्थी मान हलवली व “पैसा दिला कि चालला कागद” असे मला म्हणाले. त्यावर मी मनोहर पाटील यांना “भेटणार” असे म्हणालेवर मनोहर पाटील यांनी “हो” म्हणुन संमती दिली. मी त्यांना “परत येवु दे का” असे विचारलेवर मनोहर पाटील यांनी कार्यालयातील पुन्हा राजेंद्र पाटील यांचेकडे हाताचे बोट करुन “यांचेकडच”असे म्हणाले. त्यानंतर मी मनोहर पाटील यांनी सांगितले प्रमाणे त्यांचे कार्यालयातील

राजेंद्र पाटील यांचेकडे गेलो. त्यानंतर मी, पंच अतिश परमार व राजेंद पाटील असे बोलत कार्यालयाचे बाहेरील चहाचे टपरी वर चालत गेलो. राजेंद्र पाटील यांनी मला " नोंद घालायची म्हटल तर...परत", "तिथ पर्यंत लांबत गेलय" "त्यात काय कमी कराचय.." "दया काढा..काढा काढा.." असे म्हणुन माझेकडे पैसे मागितले. त्यावर मी राजेंद पाटील यांना "आता नायतच"असे सांगितले. मी राजेंद्र पाटील यांना रक्कम सांगणेबाबत विनंती केली असता राजेंद्र पाटील यांनी मला, "किती म्हण्टलय" असे विचारले त्यावर मी त्यांना मला यापुर्वी सांगितलेली रक्कम "पाच म्हण्टलय" असे सांगितले. त्यावर सदर राजेंद्र पाटील यांनी मला "हजार रुपये वाढाव दया मला..." असे म्हणुन माझेकडे सहा हजार रुपयांची मागणी केली. त्यावर मी राजेंद्र पाटील यांना "हा.. किती सहा...सहा हजार..." असे विचारलेवर राजेंद्र पाटील यांनी "हंम" म्हणुन होकार दिला. मी राजेंद्र पाटील यांना "साहेबांची गाठ घेवु का एकदा कन्फर्म करु दया" असे विचारलेवर सदर राजेंद्र पाटील यांनी "कश्याला घेताय मी हाय ना...मीच देणार हया उतारा तुम्हाला..." "मीच निकाल देणार हाय..."असे म्हणाले. त्यानंतर मी, पंच अतिश परमार व राजेंद्र पाटील असे पुन्हा मंडल अधिकारी कार्यालयामध्ये आलो. त्यानंतर मी मनोहर पाटील मंडल अधिकारी यांना "साहेब येतो बोलन झालय कन्फर्म परवा तुम्ही असे केल त्यांनी पन्नास मागीतल त्यामुळ मी कॅन्सल केला विषय...बाकी काय विषय नाय...आता त्यांनी सहा केलय...सहा देणार...होईल ना...काम होईल ना..." त्यावर मनोहर पाटील यांनी माझेकडे पाहुन मान हलवुन "होणार की" "उदयाच्याला सात बारा घेवुन जायच.." असे म्हणालेवर मी, मनोहर पाटील यांना "आलो अर्ध्यातासात येतो" असे म्हणुन मी व पंच अतिश परमार असे आमचेकडील दोनचाकी वाहनावरुन मंडल अधिकारी कार्यालय कडेगाव येथुन निघुन आपले समक्ष हजर झालो" वगैरे हकीकत तक्रारदार नितीन कदम यांनी सांगितली.

सदर पडताळणी कारवाईमध्ये श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांनी तक्रारदार यांचे हरकत नोंद सुनावणीचे प्रकरणाचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देवुन तक्रारदार यांचे खरेदीदस्ताची नोंद मंजुर करणेकरीता पैशांची मागणी करुन तक्रारदार नितीन कदम यांना त्यांचे कार्यालयातील काम करणारा खाजगी इसम राजेंद्र पाटील यांना भेटुन सदर लाच रक्कम त्यांचेकडे देणेस प्रोत्साहन दिले तसेच त्यांचे कार्यालयातील काम करणारे खाजगी इसम राजेंद्र पाटील यांनी मनोहर पाटील मंडल अधिकारी यांचेकरीता पाच हजार रुपये व स्वतःकरीता एक हजार रुपये असे एकुण सहा हजार रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झालेने लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव व श्री राजेंद्र पाटील यांचेवर लागलीच मंडल अधिकारी कडेगाव येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे आम्ही निश्चित केले.

मी तक्रारदार नितीन कदम यांचेकडे लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का असे विचारले असता त्यांनी त्यांचेकडे 6,000/- रूपये इतकी रक्कम उपलब्ध असल्याचे सांगून 500/- रूपये दराचे 12 नोटा असे एकुण 6,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 6,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोशि/सुदर्शन पाटील यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँथ्रासीन पावडर एक सारखी लावली व सदर 6000/- रुपये भारतीय चलनी नोटा तक्रारदार नितीन कदम यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवले.

त्यानंतर दोन्ही पंचा समक्ष प्रथम माझे, त्यानंतर तक्रारदार व त्यानंतर दोन्ही पंचाचे निवेदन रेकॉर्ड घेतलेनंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.45 वाजता सु डिग्री करून तक्रारदार यांचेकडे दिला. मी तक्रारदार यांना इशारा केलेनंतर तक्रारदार श्री. नितीन कदम व पंच नं. 1 श्री. अतिश परमार असे तक्रारदार यांचेकडील मोपेड मोटारसायकल वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी व सापळा पथक असे आवश्यक साहित्य घेऊन शासकीय चारचाकी वाहन महिंद्रा बोलेरो क्र. एम.एच 10 ई.व्ही 4684 मधुन रवाना झालो.

पंच नं. 1 श्री. अतिश परमार व तक्रारदार नितीन कदम असे मोपेड मोटरसायकल वरून कडेगाव मंडल अधिकारी कार्यालयाकडे गेले. मी व सापळा पथक असे त्यांचे पाठोपाठ जाऊन तक्रारदार व पंच नं. 1 यांचे आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. थोडया वेळाने तक्रारदार नितीन कदम व पंच नं.1)अतिश परमार हे मंडल अधिकारी कार्यालयातुन बाहेर येवुन त्यांनी त्यांचेजवळील मोबाईल फोन बाहेर काढुन कोणाला तरी फोन केला. त्यानंतर तक्रारदार श्री नितीन कदम व पंच नं.1) अतिश परमार हे त्यांचेकडील वाहनावरुन मंडल अधिकारी कार्यालयाचे बाहेर येवुन कडेगाव तडसर रोडने तहसिल कार्यालय कडेगावचे गेटजवळ जाऊन थांबले. आम्हीही त्यांचे पाठोपाठ जाऊन त्यांचे आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. थोडया वेळाने तक्रारदार नितीन कदम यांनी त्यांचेजवळील मोबाईल फोन बाहेर काढुन कोणाला तरी फोन करुन कडेगाव तहसिल कार्यालयामध्ये जाताना दिसले. तक्रारदार नितीन कदम यांनी पुन्हा त्यांचेजवळील मोबाईलवरुन कोणालातरी फोन केला व फोनवरील बोलणे झालेनंतर तक्रारदार कदम व पंच नं.1) अतिश परमार हे कडेगाव तहसिल कार्यालयाचे बाहेर येवुन त्यांचे दोनचाकी वाहनावरुन परत कडेगाव एम.आय.डी.सी.मधील ब बंद पडलेले वरलक्ष्मी टेक्सटाईल समोरील मोकळे रोडवर आले.

आम्ही सदर ठिकाणी पोहचलेनंतर मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईरा रेकॉर्डर 16.17 वाजता बंद करुन सुरक्षिततेकरीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी, तक्रारदार नितीन कदम यांना श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी यांची भेटी बाबत विचारता, तक्रारदार नितीन कदम यांनी हकीगत सांगीतली की, “मी व पंच अतिश परमार असे कडेगाव मंडल अधिकारी येथे गेलो त्यावेळी मंडल अधिकारी कार्यालयामध्ये श्री मनोहर पाटील अगर राजेंद्र पाटील हे दोन्हीही दिसुन आले नाहीत. त्यावेळी मी माझे मोबाईल क्रमांक 9096410668 वरुन मनोहर पाटील यांचे मोबाईल क्रमांक 9850777455 वर फोन असता मनोहर पाटील मंडल अधिकारी यांनी मला तहसिलदार कार्यालयामध्ये येणेस सांगितले म्हणुन आम्ही तेथुन निघुन तहसिल कार्यालय कडेगाव येथे आलो. त्यानंतर आम्ही तहसिलदार कार्यालयामध्ये गेलो व मी पुन्हा माझे मोबाईल क्रमांक 9096410668 वरुन मनोहर पाटील मंडल अधिकारी यांचे मोबाईल क्रमांक 9850777455 वर फोन केला असता मनोहर पाटील मंडल अधिकारी यांनी “तुमचा सात बारा काढुन घ्या...तुमची नोंद झाल्या..मॅडम कड साताबारा तेन खाती उतारा काढुन घ्या...” असे म्हणुन फोन कट केला. माझी व श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांची भेट न झालेने मी व पंच अतिश परमार असे तहसिलदार कार्यालय येथुन निघुन सांगितले ठिकाणी येवुन थांबलो” वगैरे हकीकत तक्रारदार नितीन कदम यांनी सांगितली. सदर सापळा कारवाईमध्ये लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम न स्वीकारता “तुमचा सात बारा काढुन घ्या...तुमची नोंद झाल्या..मॅडम कड

सातबारा तेन खाती उतारा काढुन घ्या..."े असे म्हणुन लाच रक्कम स्वीकारली नसलेचे निष्पन्न झाले. त्यामुळे दि.07.07.2026 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती थांबविली.

दि.13.07.2026 रोजी मी तक्रारदार श्री नितीन कदम यांना संपर्क करुन सकाळी 11.00 वा.चे सुमारास आम्ही कडेगाव येथे पुढील कार्यवाही साठी येत असलेचे सांगितले. त्यानंतर मी पंच श्री अतिश परमार व पंच श्री राहुल जेधे यांना संपर्क करुन 09.45 वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच 09.45 वाजता कार्यालयात हजर झाले. त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/धनंजय खाडे, पोकॉ/सुदर्शन पाटील, पोकॉ/सागर नायकुडे असे आवश्यक साहित्य घेऊन शासकीय चारचाकी वाहन महिंद्रा बोलेरो नं.एमएच-10/ई व्ही- 4684 मधून कार्यालयातून 09.55 वाजता रवाना होवून कडेगाव एम.आय.डी.सी. मधील बंद पडलेले वरलक्ष्मी टेक्सटाईलचे समोरील मोकळे रोडवर सुरक्षित ठिकाणी 11.20 वा.चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार नितीन कदम यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार नितीन कदम हे दोनचाकी वाहन होंडा शाईन आरटीओ क्रमांक एम.एच.10 सी.जे.8011 या वाहनावरुन आमचे समक्ष हजर झाले. तक्रारदार नितीन कदम यांना दि.07.07.2026 रोजीचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी तसेच राजेंद्र पाटील यांचेवर सापळा कारवाई करावायचे असलेचे सांगितले. तक्रारदार नितीन कदम यांनी लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी व राजेंद्र पाटील हे मंडल अधिकारी कार्यालयामध्ये असलेचे सांगितलेने लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी व राजेंद्र पाटील यांचेवर मंडल अधिकारी कडेगाव कार्यालयामध्ये सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी दि.07.07.2026 रोजी सापळापुर्व कारवाई वेळी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटा वापरणेचे निश्चित केले.त्यानंतर माझे सुचनेवरून दोन्ही पंचानी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.

माझे सुचनेवरून पोशि/सुदर्शन पाटील यांनी ुब्श्र् 6000/- ष्रुुव्रर्ुुै भारतीय चलनी नोटा तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईकामी दोन्ही पंचा समक्ष प्रथम माझे, त्यानंतर तक्रारदार व त्यानंतर दोन्ही पंचाचे निवेदन 12.09 वा.ते 12.13 यावेळेत डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले आहे.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.30 वाजता सु डिग्री करून तक्रारदार यांचे कडे दिला. माझे सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. नितीन कदम व पंच नं. 1 श्री. अतिश परमार असे तक्रारदार यांचेकडील होंडा शाईन आरटीओ क्रमांक एम.एच.10 सी.जे.8011 मोटारसायकल वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी व सापळा पथक असे आवश्यक साहित्य घेऊन शासकीय चारचाकी वाहन महिंद्रा बोलेरो क्र. एमएच 10 ई.व्ही 4684 मधुन रवाना झालो. तक्रारदार हे कडेगाव शहरातील कडेगाव मंडल अधिकारी कार्यालयामध्ये गेलेनंतर मी व सापळा पथक असे तक्रारदार व पंच नं. 1 यांचे पाठोपाठ जावून आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. थोडया वेळाने तक्रारदार नितीन कदम व पंच नं.1)अतिश परमार हे मंडल अधिकारी कार्यालयातुन बाहेर येवुन त्यांनी त्यांचेकडील दोनचाकी वाहनावरुन परत कडेगाव एम.आय.डी.सी.मधील बंद पडलेले वरलक्ष्मी टेक्सटाईल समोरील मोकळे रोडवर आले.

आम्ही सदर ठिकाणी आलेनंतर मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 12.44 वाजता बंद

करुन सुरक्षिततेकरीता माझ्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी, तक्रारदार यांना श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी किंवा राजेंद्र पाटील यांचे भेटीबाबत विचारता, तक्रारदार नितीन कदम यांनी हकीगत सांगीतली की, "मी व पंच अतिश परमार असे कडेगाव मंडल अधिकारी येथे गेलो. त्यावेळी कार्यालयामध्ये मंडल अधिकारी मनोहर पाटील दिसुन आले नाहीत परंतु त्यांचे कार्यालयामध्ये काम करणारे श्री राजेंद्र पाटील हे हजर होते. मी राजेंद्र पाटील यांना "आपली आता काय प्रोसेस असणार हाय पुढची" असे विचारलेवर राजेंद्र पाटील यांनी "काय माहित नाय...तलाठयांसनी इचारायच" असे सांगितले व पैसे न स्वीकारता कार्यालयाचे बाहेर येवुन ते त्यांचे मोटारसायकल वरुन निघुन गेलेने मी व पंच अतिश परमार असे आमचेकडील दोनचाकी वाहनाने मंडल अधिकारी कार्यालय येथुन निघुन सांगितलेले ठिकाणी आलो" वगैरे हकीकत तक्रारदार यांनी सांगितली.

सदर सापळा कारवाईमध्ये मंडल अधिकारी मनोहर पाटील हे कार्यालयामध्ये नसलेचे तसेच कार्यालयातील राजेंद्र पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम न स्वीकारता "तक्रारदार यांना तलाठी यांना भेटुन प्रोसेस विचारणेबाबत सांगुन तक्रारदार कार्यालयातुन निघुन गेलेचे" निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.17.07.2026 रोजी श्री नितीन कदम हे अॅन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे हजर होवुन त्यांनी हकीकत सांगितली कि, "दि.13.07.2026 रोजीचे सापळा कारवाई नंतर मी कडेगाव शहरामध्ये माझे कामानिमित्त गेलेलो असताना राजेंद्र पाटील हे मला भेटले व त्यांनी मला तुमचे नोंदीचे काम झालेले आहे व पैशाचा काही विषय नाही असे म्हणुन गेले. यावरुन राजेंद्र पाटील यांना माझी शंका आली असल्याने यानंतर ते माझ्याकडुन पैसे घेणार नसल्याची माझी खात्री झालेली आहे तसेच लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी हे देखील माझेकडुन आता लाच रक्कम स्वीकारणार नाहीत याबाबत माझी खात्री झालेली आहे. त्यामुळे आपण लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव व त्यांचे कार्यालयामध्ये काम करणारे राजेंद्र पाटील यांचेवरील सापळा कारवाई स्थगित करावी व श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव व श्री राजेंद्र पाटील यांचेवर लाच मागणीचे अनुशंगाने कायदेशिर कारवाई करावी" असा जबाब दिला.

तरी दि.07.07.2026 रोजी मंडल अधिकारी कार्यालय,कडेगाव येथे केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये, श्री मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव यांनी तक्रारदार यांचे हरकत नोंद सुनावणीचे प्रकरणाचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने देवुन तक्रारदार यांचे खरेदीदस्ताची नोंद मंजुर करणेकरीता तक्रारदार यांचेकडे पैशांची मागणी करुन तक्रारदार नितीन कदम यांना त्यांचे कार्यालयातील काम करणारा खाजगी इसम राजेंद्र पाटील यांना भेटुन सदर लाच रक्कम त्यांचेकडे देणेस प्रोत्साहन दिले तसेच त्यांचे कार्यालयातील काम करणारे खाजगी इसम राजेंद्र पाटील यांनी मनोहर पाटील मंडल अधिकारी यांचेकरीता पाच हजार रुपये व स्वत:करीता एक हजार रुपये असे एकुण सहा हजार रुपये लाचेची मागणी केलेने 1)लोकसेवक मनोहर पाटील मंडल अधिकारी कडेगाव रा.श्री उपासना बंगला,किसान नगर,पश्चिम रस्ता क्रमांक 5,सिध्दांत मेडिकल एजन्सी जवळ इस्लामपुर,ता.वाळवा जि.सांगली यांचेवर व 2) श्री राजेंद्र विष्णु पाटील रा.मु.पो.राजापुर ता.तासगाव जि.सांगली यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7(अ), 12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट

काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

वर्दीजबाब, हा दिला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Sudhir Anandrao Tordamal (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: RUPALI RAMESH SUTAR
Rank: HC (Head Constable)
Unique No: 91159397005000286
On: 8/24/2026 9:33:50 PM
At PS: KADEGAON, SANGLI

पो.स्टे.ऑफिसर
कडेगांव पोलिस ठाणे

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Sudhir Anandrao Tordamal

14.

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची / खबर देणाऱ्याची सही / अंगठा)

No. (क्र.): SudTor1986429

योगेश चव्हाण
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवण्याची तारीख व वेळ):